# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १४ ◆ अंक ४८ ◆ अमरावती ◆ दि. २८ मार्च ते ३ एप्रिल २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## राज्यात उष्णतेच्या झळा वाढल्या

पुणे: राज्यात गेल्या आठवड्यापासून उष्णतेच्या झळा चांगल्याच वाढू लागल्या आहेत. राज्यात अकोल्यात सर्वाधिक तापमान ४२.८ अंश सेल्सिअस नोंदवले असून, मालेगावही चांगलेच तापले आहे. तर सर्वात कमी तापमान मुंबईत ३१.४ नोंदवले गेले आहे. पुढील चार ते पाच दिवस उष्णतेच्या झळा आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रावर हवेच्या वरच्या स्तरात एक प्रती चक्रवाताची स्थिती तयार झाली आहे. त्यामुळे राज्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागत आहे. राज्यात विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात तापमान कमालीचे वाढले आहे. हवेच्या वरच्या स्तरात प्रती चक्रवाताची स्थिती तयार झाल्याने कमाल तसेच किमान तापमानात मोठी वाढ झाली आहे.

# भाजपाकडून नवनीत राणांना अमरावतीतून लोकसभेची उमेदवारी

अमरावती : खासदार नवनीत राणा या बनावट जातप्रमाणपत्र सादर करून अमरावतीची लोकसभा निवडणूक लढल्याचा त्यांच्यावर आरोप होत आहे. अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने राणा यांचं जातप्रमाणपत्र रद्द करावं असा निर्णय दिला आहे. परंतु, या निर्णयाला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिलं. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राणा यांच्या याचिकेवरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे. या जातप्रमाणपत्राच्या प्रकरणामुळे राणा यांच्या उमेदवारीसमोर अडचणी येत होत्या. त्याचबरोबर नवनीत राणा कोणत्या पक्षाकडून लोकसभा निवडणूक लढवणार याबाबत संभ्रमाचं वातावरण होतं. मागील लोकसभा निवडणुकीत (२०१९) नवनीत राणा या राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत उमेदवार होत्या. त्यावेळी त्यांनी शिवसेनेचे तेव्हाचे खासदार आनंदराव अडसूळ यांचा पराभव केला होता. यावेळी नवनीत राणा या भाजपाच्या

### आनंदराव अडसूळ, बच्चू कडू काय भूमिका घेणार?

तिकिटावर अमरावतीची लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छूक होत्या. परंतु, त्यांना शिवसेनेकडून आणि भाजपाच्या इतर मित्रपक्षांकडून विरोध होत आहे. त्यामुळे नवनीत राणा यांच्या उमेदवारीबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. अखेर पक्ष आणि एनडीएतील मित्रपक्षांचा विरोध झुगारून भाजपाने नवनीत राणा यांना अमरावतीतून लोकसभेचं तिकीट दिलं आहे. भाजपाने लोकसभा उमेदवारांची सातवी जादी जाहीर केली असून यामध्ये नवनीत राणा यांचं नाव आहे.

नवनीत कौर राणा यांना अमरावतीत शिवसेनेकडून विरोध होत होता. तसेच येथील माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनीदेखील राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. राणा यांना उमेदवारी मिळाल्यास आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही, अशी ठाम भूमिका अडसूळ यांनी घेतली होती. अमरावतीमधील



एनडीएतील मित्रपक्ष असलेल्या प्रहार जशक्ती पार्टीचे प्रमुख बच्चू कडू यांचाही राणा यांना विरोध आहे. अशा परिस्थितीत राणा यांना भाजपाकडून उमेदवारी मिळणार की नाही यावर प्रश्नचिन्ह होतं. परंतु, भाजपाने राणा यांना अमरावतीतून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. भाजपाने काही वेळापूर्वी लोकसभा उमेदवारांची सातवी यादी जाहीर केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील अमरावतीतून नवनीत राणा यांना तर कर्नाटकच्या चित्रदुर्गमधून गोविंद करजोल यांना उमेदवारी दिली आहे.

बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. ते म्हणाले, आमच्या सर्व कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की ज्या नवनीत राणाने आम्हाला अपमानित केलं त्यांचा प्रचार आम्ही करणार नाही. कार्यकर्त्यांची मानसिकताच नाही. राजकारणात झीरो झालो तरीही चालेल पण इतकी शरणागती पत्करणार नाही. काहीही झालं तरीही राणांचा प्रचार करायचा नाही ही कार्यकर्त्यांची मानसिकता आहे.

**नवनीत राणांची राजकीय वाटचाल**

नवनीत कौर-राणा या चित्रपट अभिनेत्री होत्या. यांनी बडनेराचे आमदार रवी राणा यांच्याशी २०११ मध्ये विवाह केला. त्यानंतर त्यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळवले होते. २०१४ च्या निवडणुकीत नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारीवर अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली होती. परंतु, त्यावेळी शिवसेनेच्या आनंदराव अडसूळ यांनी राणा यांचा तब्बल १ लाख ३७ हजार मतांनी पराभव केला होता. राणांच्या जात प्रमाणपत्राविरोधात २०१७ मध्ये आनंदराव अडसूळ यांनी याचिका दाखल केली होती.

## नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया आजपासून

अमरावती : अमरावती लोकसभा मतदारसंघाकरिता गुरुवारपासून नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात जिल्हाधिकारी हे नामांकन स्वीकारणार आहे. नामांकन दाखल करतेवेळी उमेदवारांसह अन्य चार जणांनाच येथे एण्ट्री दिली जाणार आहे. ४ एप्रिलपर्यंत नामांकन स्वीकारले जाणार असून शासकीय सुटीचे २ दिवस वगळता सहा दिवस नामांकन स्वीकारले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली.

लोकसभेची राजकीय रणधुमाळी खऱ्या अर्थाने नामांकन दाखल करण्यापासूनच सुरू होईल. अद्यापही बहुतांश पक्षांचे उमेदवार घोषित झाले नाही. परंतु, गुरुवारपासून नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याने आता राजकीय घडामोडीलादेखील वेग येणार आहे. ४ एप्रिलपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात नामांकन स्वीकारले जाणार आहे. यामध्ये शुक्रवारी व रविवारी शासकीय सुटी येत असल्याने हे दोन दिवस वगळता अन्य सहा दिवस नामांकन दाखल करण्याकरिता मिळणार आहे. नामांकन अर्ज उचल करण्याकरिता शुल्क नसल्याने कुणालाही या अर्जाची उचल करता येणार आहे. मात्र, नामांकन भरतेवेळी १२ हजार ५०० रुपये भरावे लागणार आहे. सकाळी ११ वाजतापासून नामांकन भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. दुपारी ३ वाजेपर्यंत नामांकन स्वीकारले जाणार आहे. नामांकन भरण्याकरिता सोबत असलेल्या संबंधित पक्षाच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेरच थांबविले जाणार आहे. केवळ उमेदवार आणि सोबत अन्य चार जणांना आत सोडले जाईल. याशिवाय उमेदवारांच्या तीन गाड्यांना येथे एण्ट्री दिली जाणार आहे.आदर्श आचारसंहिता लागू असल्याने कोणत्याही राजकीय पक्षाने सभा, बैठकी अथवा कार्यक्रम घ्यावयाचा असल्यास याची परवानगी घेणे सक्तीचे आहे. अन्यथा आयोजकांवर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले

# वंचितने ९ उमेदवार जाहीर केले असतील तर हे संविधानाचे दुर्दैव

## संजय राऊतांची आंबेडकरांवर बोचरी टीका

मुंबई : ठाकरे गटाने आज लोकसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पहिल्या यादीत शिवसेनेने १७ उमेदवार जाहीर केले आहेत. तर, वंचित बहुजन आघाडीनेही नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. वंचितने परस्पर शिवसेनेबरोबरची युती तोडल्यामुळे संजय राऊतांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी यावरून प्रतिक्रिया दिली आहे. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.

प्रकाश आंबेडकर यांना आम्ही अकोल्यासह चार जागा देण्यास तयार झालोच होतो. आज जर चर्चा पुढे गेली असती तर सहावी जागाही कदाचित त्यांना दिली असती. हे आम्ही तीन पक्षांनी ठरवले होते. काहीही झाले तरी प्रकाश आंबेडकर यांना बरोबर घेण्याचे आम्ही ठरविले होते, असं संजय राऊत यांनी सांगितले.

संजय राऊत म्हणाले की, आघाडीत जागावाटप करताना अनेक मर्यादा येतात. तरी आम्ही क्षमतेपेक्षा



जास्त जागा वंचित बहुजन आघाडीला देण्याचा प्रयत्न केला. पाच जागा त्यांना आधीच दिल्या. गरज पडल्यास सहावी जागा देण्याचेही ठरले होते. कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या भाजपाला मदत होणार नाही, अशी काळजी घेण्याचे ठरले होते. प्रकाश आंबेडकर यांनी नऊ उमेदवार जाहीर केले असतील तर हे महाराष्ट्राचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधानाचे दुर्दैव आहे, असे मी मानतो.

प्रकाश आंबेडकर यांनी नागपूरमध्ये काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. तसेच सांगलीमध्ये प्रकाश शेंडगे निवडणुकीला उभे राहिल्यास त्यांनाही पाठिंबा देऊ केला आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांच्याशी सामाजिक युती होऊ शकते, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली.

प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या संघटनेचा निर्णय घेतला आहे. तरीही त्यांना आमच्याबरोबर घेण्याचे प्रयत्न आम्ही करत राहू. काहीही झाले तरी मविआ पूर्ण ताकदीने निवडणुकांना सामोरे जाईल, असे संजय राऊत म्हणाले.

यावेळी संजय राऊत यांनी काँग्रेसशी सुरू असलेल्या वादावरही आपले मत व्यक्त केले. सांगलीमध्ये उबाठा गटाने चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. तसेच वायव्य मुंबईत उबाठा गटाने अमोल किर्तीकर यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे. याही जागेवर काँग्रेसचे नेते संजय निरुपम यांना दावा केलेला आहे. मात्र या दोन्ही जागा आमच्या असून आम्ही अनेक वर्षांपासून तिथे उमेदवार देत आहोत. काँग्रेसची नाराजी असले तर आम्ही चर्चेतून त्यावर तोडगा काढू, असेही संजय राऊत यांनी यावेळी सांगितले.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## निवडणूक व्हावी पर्यावरणपूरक

*पाच वर्षांपूर्वी, १० मार्च २०१९ या दिवशी केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या तारखा घोषित केल्या, तेव्हा जारी केलेल्या काही निर्देशांनी जनतेचे लक्ष वेधून घेतले होते. निवडणुकांच्या इतिहासात निवडणूक आयोगाने नेहमीच प्रदूषणाचा आणि पर्यावरणाचा मुद्दा महत्त्वाचा मानला आणि निवडणुकांच्या काळात पर्यावरणास हानी पोहोचेल अशी कोणतीही कृत्ये करण्याबाबत इशारे देणारी नियमावली जारी केली आहे. प्रचार मोहिमेदरम्यान विघटन न करता येणारा किंवा एकदाच वापरता येणारा, प्लास्टिक किंवा पर्यावरणास घातक ठरणारा कोणताही घटक वापरला जाऊ नये आणि ध्वनिप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या ध्वनिक्षेपकांच्या आवाजावरील मर्यादेचे भान राखावे असे आयोगाने वारंवार बजावले होते. भारतीय लोकशाहीत निवडणुका हा एक सोहळा असल्याने व सोहळे साजरे करताना पर्यावरणाचे भान विसरण्याचीच बहुधा प्रथा असल्याने, प्रदूषणासारख्या महत्वाच्या मुद्द्यावर आयोगाने राजकीय पक्षांना व उमेदवारांस सावध केले, म्हणून आयोगाच्या त्या निर्णयाचे जोरदार स्वागत झाले होते आणि दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या पर्यावरणाच्या समस्येमुळे चिंतित असलेल्या समाजात काहीसे समाधानाचे वारेही वाहू लागले होते. केंद्रीय हरित लवादातही या प्रश्नावर बराच खल झाला होता. आयोगाने जारी केलेल्या पर्यावरणपूरक उपाययोजनांचे निर्देश लोकांपर्यंत पोहोचले त्याच दिवशी, ११ मार्च रोजी केरळ उच्च न्यायालयाने तसा आदेशच जारी करून राज्यातील निवडणुकांत विघटन न होणारे प्रचार साहित्य आणि फ्लेक्सच्या वापरावर बंदी घातली होती. त्याआधीच्या डिसेंबरात राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांतही आयोगाने असाच आदेश जारी केला होता. यासंदर्भात झालेल्या सुनावणीदरम्यान पर्यावरणप्रेमींनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेली माहिती पाहता, निवडणुकांचे दिवस हे पर्यावरणास हानी पोहोचविणाऱ्या इतर घटकांइतकेच प्रदूषणकारी ठरतात, या वास्तवाकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले होते. विधानसभा निवडणुकांदरम्यान कोणत्याही एका मतदारसंघात किमान दहा टन प्लास्टिकचा नवा कचरा निर्माण होत असतो, असा एका याचिकेद्वारे तेव्हा न्यायालयासमोर केला गेलेला दावा पाहता, देशभरातील सर्व मतदारसंघांतील निवडणूक प्रचारातील असे साहित्य पर्यावरणाच्या मुळावर कसे येते, याची कल्पना करणे अवघड नाही. कोणतीही निवडणूक पर्यावरणस्नेही किंवा पर्यावरणपूरक व्हावी यासाठी आयोगाने जारी करावयाच्या सूचनांची ही प्रथा नवी नाही. तरीही प्रत्येक निवडणुकीदरम्यान आयोगाने तसा आदेश जारी करावा आणि पर्यावरणाच्या चिंतेने ग्रासलेल्या जनतेने त्यावर समाधान व्यक्त करावे ही नैमित्तिक प्रथा होऊन राहिली आहे. याआधी जुलै १९९९ मध्ये आयोगाने असाच आदेश जारी केला आणि पुढे जवळपास प्रत्येक निवडणुकीत या आदेशाची पुनरावृत्ती होत गेली. आजवर वेगवेगळ्या निवडणुकांच्या काळात किमान दहा वेळा असे आदेश जारी करण्यात आले आहेत आणि आता येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्याचीच पुनरावृत्तीही झाली आहे. विशेष म्हणजे प्रत्येक निवडणुकीदरम्यान, पर्यावरणस्नेही प्रचाराचा आदेश आयोगाकडून दिला जात असला, तरी प्रत्येक आदेश हा जणू पहिलाच आदेश असावा अशा समजुतीत त्याची चर्चा होते आणि आदेशाची बातमीही होते. म्हणूनच अशा आदेशांचे पालन करण्याबाबत राजकीय पक्ष आणि विविध राजकीय पक्षांचे उमेदवार किती सतर्क आहेत, यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी मतदार या नात्याने जनतेने घ्यावयास हवी. यासंदर्भात न्यायालयास सादर करण्यात आलेल्या त्या आकडेवारीनुसार, एका विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या काळात दहा टन प्लास्टिकचा कचरा निर्माण होतो. तसे असेल तर देशभर होऊ घातलेल्या या निवडणुकीदरम्यानच्या कचऱ्यावर लक्ष ठेवण्याचे काम सामूहिकरीत्या समाजाने करावयास हवं आणि आयोगाने जारी केलेल्या आदेशाचे पालन होते किंवा नाही, याबाबत लोकशाहीचा धागा या नात्याने जागरूकही रहावयास हवे. आजच्या काळात, पर्यावरणविषयक समस्या हा मोठा चिंतेचा विषय झाला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगासही त्याबाबत चिंता वाटणे सहाजिकच आहे. पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स आदी प्रकारचे विघटन न होणाऱ्या पदार्थांपासून तयार होणारे प्रचार साहित्य वापरू नये, अशा सूचना आयोगाने उमेदवारांना आणि राजकीय पक्षांना दिल्या आहेत, याची जाणीव जनतेस असणेही आवश्यक आहे.*

# बंजारा भाषा, साहित्य, संस्कृतीसाठी ऐतिहासिक ठेवा

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत बंजारा समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून बंजारा साहित्य, संस्कृती व कला ही भारतीय विविधतेला समृद्ध करणारी एक वैशिष्ट्यपूर्ण ठेवा आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात बंजारा लोकसाहित्य टिकून आहे. बंजारा भाषिकांची संख्याही राज्यात मोठयाप्रमाणात आहे. राज्यात सिंधी, ऊर्दू, गुजराती अकादमी स्थापन केल्या गेली, परंतु बहुसंख्येने असलेल्या व समृद्ध लोकसाहित्य व संस्कृती असणाऱ्या बंजारा भाषिकांसाठी अकादमी नसल्याची वेदना प्रख्यात साहित्यिक एकनाथ पवार यांनी पुसद येथील एका बैठकीत बोलून दाखवली होती. त्यासाठी साहित्य संस्कृती क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत एक सभा आयोजित करण्याचे त्याचवेळी ठरविण्यात आले. बंजारा साहित्य संस्कृती व कलेसाठी एक शाश्वत मंच असावे. भारतीय विविधतेत इतर भाषिकासह सुसंवाद साधत बंजारा साहित्य समृद्ध व्हावे. गोर बंजारा भाषेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी प्रोत्साहन आणि बंजारा भाषेतील वाङ्.मयीन कृती प्रकाशित करण्यास तरतूद असावी यासाठी गोर बंजारा साहित्य अकादमीची संकल्पना त्यांनी सर्वप्रथम मांडली.



गोर बंजारा अकादमीची पायाभरणी, घोषणा , पाठपुरावा आणि शासन निर्णय हा प्रवास अतिशय प्रेरक आणि संघर्षमय आहे. ज्याप्रमाणे एखाद्या निर्माण कार्याचे भिंत, सजावट , कळस जितके महत्वपूर्ण असते, तितकेच महत्त्वाचे म्हणजे त्यासाठी स्वत: ला गाडून घेणारा पाया आणि या पायाचे शिलेदार देखील महत्त्वाचे असतात. कारण संकल्पना, प्रारुप शिवाय कोणत्याही बाबींचा प्रवास सुरू होत नसतो. या संकल्पनेला खऱ्याअर्थाने मोठे पाठबळ ना.संजयभाऊ राठोडांचे मिळाले. हे विशेष. ना.संजय राठोड हे संस्कृती प्रिय व धडाडीचे व्यक्तिमत्व म्हणून बहुजन समाजात ओळखले जातात. त्यांच्या प्रयत्नांने श्रीक्षेत्र पोहरागड येथे ऐतिहासिक नगारा वास्तूसंग्राहालय भूमीपूजन सोहळ्याचे आयोजन ३ डिसेंबर २०१८ रोजी करण्यात आले होते. या निमित्ताने अकादमीसाठी अतिशय सुंदर योग जुळून आले. जिथे बंजारा अकादमीची संकल्पना, पायाभरणी झाली. मान्यवरांची अभिमत मिळाली. त्याच पवित्र ठिकाणी लाखोंच्या जनसागरापुढे तत्कालीन शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे, ज्येष्ठ नेते मनोहरराव नाईक, मंत्री ना. पंकजा मुंडे, मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार , मंत्री ना.दादासाहेब भूसे , आमदार हरिभाऊ राठोड यासह अनेक मान्यवर लोकप्रतिनिधी महोदयांच्या उपस्थितीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बंजारा अकादमी स्थापन करण्याची ऐतिहासिक घोषणा केली. हा दिवस खरंतर सर्वांसाठी अतिशय आनंदाचा क्षण ठरला. खऱ्याअर्थाने बंजारा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली जाणारी ही एक गौरवपूर्ण बाब म्हणता येईल.

### संजयभाऊ राठोडमुळे अकादमीचे स्वप्न साकार


बंजारा अकादमीची घोषणा झाल्यानंतरही तडफदार नेतृत्व संजयभाऊ राठोड , माजी खासदार हरिभाऊ राठोड आणि अकादमीची संकल्पना मांडणारे सर्जनशील साहित्यिक एकनाथ पवार यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा सुरू ठेवला. तत्कालीन आमदार हरिभाऊ राठोड आणि आमदार राजेश राठोड यांनी विधानपरिषदेत अकादमीचा मुद्दा देखील मांडला होता. त्यामुळे अकादमी विषयी साहित्य वर्तुळात चर्चाही होत असे. सिंधी, गुजराती अकादमीच्या धर्तीवर स्वतंत्रपणे बंजारा अकादमी स्थापन व्हावी यासाठी प्रयत्न सुरू होते. दरम्यान माजी खासदार हरिभाऊ राठोड आणि एकनाथ पवार यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची बंजारा भाषेला दर्जा , संवर्धन आणि बंजारा अकादमीसाठी भेटही घेतली. त्यावेळी मी बेलापूर ठाणे येथे होतो, काही तांत्रिक कारणांमुळे मला निवेदनासाठी जाता आले नाही, परंतु माझी सदिच्छा त्यांच्यासोबत होती. सहा –सात वर्ष उलटली परंतु अकादमी स्थापनेला मुहूर्त लाभत नव्हता. परंतु ना. संजय राठोड स्वतः बंजारा संस्कृती आणि सामाजिक प्रश्नांच्या संदर्भाने शासन दरबारी प्रयत्नशील असल्याने अखेर त्यांच्या पुढाकाराने १६ मार्च २०२४ रोजी गोर बंजारा अकादमी स्थापन करण्याचा ऐतिहासिक शासन निर्णय मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक मंत्री सुधिर मुनगंटीवार यांनी घेतला. गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापन करण्याचा शासन निर्णय येताच प्रसिद्ध साहित्यिक एकनाथ पवार यांनाच नव्हे तर साहित्य वर्तुळातील साहित्यिक , कवी , लेखक , समिक्षक, विचारवंत, नाटककार, गितकार या सर्वांना हर्ष झाला. विशेष म्हणजे अकादमी स्थापनेत ज्यांचा पुढाकार होता त्या सर्व शिलेदारांचा आनंद गगनात मावेनासा झाला. बंजारा भाषा, साहित्य, संस्कृती व कलेला शाश्वत मंच मिळण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक एकनाथ पवार यांनी अकादमीची जी संकल्पना मांडली होती, ते प्रत्यक्षात अवतरल्याचे आनंद होणे स्वाभाविकच होते. कारण बंजारा अकादमी ही बंजारा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली जाणारी एक ऐतिहासिक ठेवा ठरली. अखेर ना.संजयभाऊ राठोडमुळे अकादमीचे स्वप्न साकार झाले. आणि गोर बंजारा अकादमीचे खऱ्याअर्थाने साहित्यिक एकनाथ पवार शिल्पकार ठरले आहे.

### गोर बंजारा अकादमीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

वैभवशाली संस्कृती जोपासणाऱ्या बंजारासाठी बंजारा भाषा, साहित्य, संस्कृती , कलांचे संवर्धन व्हावे. इतर भाषिकांच्या साहित्य अकादमी प्रमाणेच बंजाराचा समृद्ध वारसा अबाधित रहावे. भारतीय विविधतेत बंजारा साहित्य संस्कृतीची प्रचिती यावी, बंजारा भाषेतून साहित्य निर्मितीला चालना मिळावी यासाठी श्रीक्षेत्र पोहरागड, भक्तीधाम येथे सन २०१५ मध्ये पहिली सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेसाठी विशेष करून उद्योजक तथा समाजसेवी किसनराव राठोड यांनी पुढाकार घेऊन उपस्थित सर्व मान्यवराच्या आदरातिथ्याची व्यवस्था केली होती. काही महत्त्वाच्या कामामुळे त्यांना येता आले नाही म्हणून त्यांनी फिल्म निर्माते समाजसेवी ड.पंडीत राठोड यांना पाठविले होते. बंजारा अकादमीसाठी किसनराव राठोड प्रोत्साहित करीत असे. सभेत बंजारा साहित्य संस्कृतीचे अभ्यासक तथा साहित्यिक एकनाथ पवार यांनी बंजारा अकादमीची संकल्पना मांडून उद्दिष्टे, प्रारुप व स्वरूप मांडले होते. या प्रारुपवर प्रबोधनकार प्रेमदास महाराज वनोलीकर, महंत जितेंद्र महाराज, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.मोतीराज राठोड आणि ज्येष्ठ साहित्यिक पंजाब चव्हाण यांनी अभिमत मांडून सहमती दर्शवली होती. या पायाभरणीच्या सभेला साहित्य संस्कृती क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात प्रसिद्ध प्रबोधनकार प्रेमदास महाराज वनोलीकर, महंत जितेंद्र महाराज, रमेश महाराज, जि.प. उपाध्यक्ष बाबूसिंग नाईक, ड. पंडीत राठोड, ज्येष्ठ साहित्यिक पंजाब चव्हाण पुसद, प्रसिद्ध कवी रतन आडे हिंगोली, प्रा.नरेंद्र जाधव, संपादक गोविंदराव चव्हाण, नांदेड, प्रा.विलास राठोड कारंजा , अशोक पवार , डॉ.शांतीलाल चव्हाण, पत्रकार अवी चव्हाण , पत्रकार शंकर आडे , पत्रकार अनिल राठोड , अरविंद पवार यवतमाळ यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी अकादमीच्या उद्दिष्टावर विस्तृत चर्चा करून शासन स्तरावर अकादमी स्थापन करण्यासाठी हालचाली करण्याचे ठरविण्यात आले. पुढे अकादमीसाठी साहित्यिक एकनाथ पवार यांनी पाठपुरावा सातत्याने सुरू ठेवला. संकल्पना ,पायाभरणी, पाठपुरावा आणि प्रसार या चौफेर पातळीवर योगदान दिल्याने गोर बंजारा साहित्य अकादमीचे खऱ्याअर्थाने साहित्यिक एकनाथ पवार हे शिल्पकार ठरले आहे. नगारा वास्तूसंग्राहालय भूमीपूजन सोहळ्याचे ऐतिहासिक सोहळ्याप्रसंगी अकादमीसाठी केलेल्या घोषणांचा फॉलोअप मंत्री संजयभाऊ राठोडांनी अतिशय पोटतिडकीने सुरु ठेवले. त्यांच्या पुढाकाराने साहित्यिक –भाषिक आदान – प्रदानातून राज्याचा सांस्कृतिक विकास साधून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी या हेतूने महाराष्ट्र राज्य गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापन करण्याच्या निर्णयामुळे बंजारा साहित्य क्षेत्राला एक स्वर्णिम भेट मिळाली. हे विशेष.

### गोर बंजारा अकादमीची प्रेरक उद्दिष्टे

राज्यातील बहुभाषिकांच्या म्हणजेच मराठी भाषिकांचे संस्कृती, साहित्य, भाषा व लोकजीवनाशी सुसंवाद साधून सांस्कृतिक सुसंवाद साधण्याची कला या भाषिकांना अल्पसंख्यांकांना अवगत व्हावे. गोर बंजारा भाषा, साहित्य, कला व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करणे. गोर बंजारा भाषा, साहित्य आणि कला क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कृत करणे. गोर बंजारा भाषेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी प्रोत्साहन देणे. गोर बंजारा भाषेतील वाङ्.मयीन कृती प्रकाशीत करण्यास सहाय्य करणे. गोर बंजारा भाषिक अल्पसंख्याकांनी केवळ त्यांच्या भाषेतील कार्यक्रम आयोजित करुन मर्यादित सुसंवाद ठेवण्याऐवजी त्यांच्या भाषेतील कार्यक्रमांसोबतच मराठी व इतर भाषिक कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये मराठी भाषिकांनाही सहभागी करुन सामाजिक सुसंवाद निर्माण करणे. तसेच गोर बंजारा या भाषेसोबतच मराठी भाषेतही परीसंवाद, चचासत्रे, कवीसंमेलने आयोजन करणे. अशी महत्वपूर्ण उद्दिष्टे महाराष्ट्र राज्य गोर बंजारा अकादमीची आहे. भविष्यात बंजारा साहित्य, संस्कृती ,भाषा व कलेसाठी अकादमी एक ऐतिहासिक ठरणार असून या ऐतिहासिक अकादमीसाठी विशेष योगदान देणाऱ्या सर्व शिलेदारांचा नाव बंजारा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले जातील. बंजारा भाषा साहित्य संस्कृती व कलेला अकादमीच्या माध्यमातून एक स्वर्णिम भविष्य लाभेल असा आशावाद या निमित्ताने दिसून येते.



**- पंजाबराव चव्हाण,**
**ज्येष्ठ साहित्यिक,**
**पुसद ,**
९४२१७७४३७२

# राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धेत सिद्धान्त मोडक

## प्रथम जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडून सन्मानित



अमरावती : महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत डॉन बॉस्को सेंटर फॉर लर्निंग, मुंबई येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कौशल्य विकास स्पर्धेत अमरावती आयटीआयटा माजी विद्यार्थी सिद्धान्त दिलीप मोडक याने सुवर्ण पदक पटकावल्याने त्याची राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेसाठीनिवड करण्यात आली, त्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांच्या हस्ते त्याला सन्मानित करण्यात आले. भारतीय उद्योग महासंघ, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कौशल्य विकास स्पर्धा 'इंडिया स्किल्स २०२३-२४' चे आयोजन नुकतेच करण्यात आले. सप्टेंबर २०२४ मध्ये फ्रान्समधील लियोन येथे आयोजित जागतिक कौशल्य २०२४ कार्यक्रमात भारताचे प्रतिनिधित्व करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ६० ट्रेडमध्ये ३०० हून अधिक उमेदवारांचा सहभाग होता. या स्पर्धेत २१,००० हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते, ज्यामध्ये राज्यस्तरावर ४३०० स्पर्धकापैकी वेगवेगळ्या निकषानंतर अंतिम ११० स्पर्धकांची निवड करण्यात आली. राज्यस्तरीय या स्पर्धेमध्ये सिद्धान्त दिलीप मोडक याने सुवर्ण पदक पटकावल्याने राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामधून या स्पर्धेमध्ये स्पर्धक सहभागी झाले होते. राज्यस्तरीय पात्रता फेरीत सिद्धांत मोडकने पेंटिंग अँड डेकोरेटिंग ह्या कौशल्य प्रकारात सुवर्णपदक पटकवले. त्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सिद्धांत मोडक याला त्यांच्या मातोश्रीसह स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले. यावेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती कार्यालयामधील सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, वैभव तेट्टू, जिल्हा कौशल्य विकास समन्वयक व प्रविण बांबोळे, वरिष्ठ-लिपिक तसेच सिद्धान्त मोडकच्या मातोश्री प्रमिला दिलीप मोडक हया उपस्थित होत्या.

## पिंपळोद येथे भीषण पाणीटंचाई

दर्यापूर : तालुक्यातील पिंपळोद श्रीक्षेत्र संत परशराम महाराज यांच्या गावात मागील गेल्या चार ते पाच वर्षांपासून दहा ते बारा दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येतो. गरीब जनता आपली कामे सोडून या भीषण टंचाईमुळे हैराण झाले आहे. येत्या तीन ते चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास लोकप्रतिनिधींना गावबंदी तसेच मतदानांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा पिंपळोद ग्रामवासीयांनी दिला आहे. संबंधित ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना वारंवार अनेक लेखी तक्रारी, आंदोलने करूनसुध्दा उपयोग झाला नाही. पाणी असतांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण्याचा कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणामुळे पिंपळोद येथे पिण्याच्या पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण झालेली आहे. गावकऱ्यांकडून व ग्रामपंचायत सरपंच व राजकीय पुढाऱ्यांनी पाणीपुरवठा विभाग व संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क साधूनसुद्धा गावकऱ्यांना फक्त आश्वासन दिल्या जात आहे.

येत्या तीन ते चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास येणाऱ्या लोकप्रतिनिधी यांना गावबंदी करण्यात येईल तसेच मतदानांवर बहिष्कार टाकण्यात येईलअसा इशारा पिंपळोद ग्रामवासीयांनी दिला आहे.

## निवडणुकीच्या धामधुमीत शेतमालांचे दर हमीभावाच्या खाली



धामणगाव : ऐन निवडणुकीच्या धामधुमीत कापूस, सोयाबीन, हरभरा यासह शेतमालाचे भाव घसरले आहेत. नाफेडनेही अद्याप हरभऱ्याची नोंदणी सुरू केली नाही. परिणामी, हमीभावापेक्षाही कमी दराने शेतमाल विकण्याची वेळ बळीराजावर आली आहे.सध्या देशात सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. यावर्षी अनियमित पावसामुळे अगोदरच शेतकऱ्यांना फटका बसला. त्यातच शेतमालाचे भाव पडल्याने तो चांगलाच आर्थिक अडचणीत सापडला आहे. सुरुवातीला सोयाबीनचे भाव प्रतिक्विंटल पाच हजार रुपयांच्या वर गेले होते. शेतकऱ्यांचे सोयाबीन बाजारात आले तेव्हा मात्र हा भाव सतत खाली आला. सध्या प्रतिक्विंटल ४ हजार १०० रुपयांवर खाली आलाआहे. परिणामी, गेल्या वर्षीपासून भाव वाढण्याची वाट पाहणाऱ्या सोयाबीन उत्पादकांची चांगलीच अडचण झाली आहे. शासनाकडून दिला जाणारा सोयाबीनचा हमीभाव ४ हजार ६०० रुपये आहे; मात्र यावर्षी या हमीभावाने सोयाबीनची खरेदी झाली नाही. आता हरभऱ्याचीही तीच गत आहे. हरभऱ्याचे उत्पादन येण्यापूर्वी अमरावती जिल्ह्यात हरभऱ्याचा भाव प्रतिक्विंटल ७ हजार ३०० पर्यंत वर चढला होता. हरभरा बाजारात येताच हा भाव खाली खाली जात आता ५ हजारांवर आला आहे. शासनाचा हरभऱ्याचा हमीभाव ५ हजार ४४० रुपये प्रति क्विंटल आहे. दरवर्षी नाफेडद्वारा फेब्रुवारी महिन्यात नोंदणी करून मार्च महिन्यापासून हरभऱ्याची खरेदी केल्या जाते. यावर्षी मात्र अद्याप नोंदणीलाही सुरुवात न झाल्याने नाफेडला हरभरा घ्यायचा आहे की नाही, असा सवाल उपस्थित झाला आहे.

## समाजकल्याण अधिकारीपदी सरिता बोबडे



अमरावती : प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण कार्यालयात वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक या पदावर कार्यरत असलेल्या सरिता बोबडे यांची येथील कार्यालयातच समाजकल्याण अधिकारी पदावर पदोन्नतीने निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे. प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण कार्यालयात गत पाच वर्षांपासून सरिता बोबडे ह्या वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक म्हणून कार्यरत होत्या. दरम्यान समाजकल्याण विभागाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. समाजकल्याण विभाग अंतर्गत येत असलेल्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे वेळोवेळी अभिनंदनसुद्धा करण्यात आले आहे. त्यानंतर आता येथील कार्यालयातच समाजकल्याण अधिकारी या पदावर त्यांची पदोन्नतीने निवड झाली आहे. येथील समाजकल्याण अधिकारी म्हणून त्या पहिल्या महिला अधिकारी असतील हे विशेष.

## मुलावर प्राणघातक हल्ला; आरोपी वडिलाला अटक




अमरावती : घरगुती कारणावरून उद्भवलेल्या वादात वडिलाने मुलावर प्राणघातक हल्ला केला. ही घटना धुलिवंदनाच्या दिवशी २५ मार्च रोजी सायंकाळी नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील शेंदोळा धस्कट येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी वडिलाला अटक केली असून न्यायालयाने त्याला २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सर्विस राजू पवार (४०) असे जखमी मुलाचे तर राजू जलतारी पवार (६०) असे आरोपी वडिलाचे नाव आहे. शेंदोळा धस्कट येथील रहिवासी सर्विस व राजू यांच्यात धुलिवंदनाच्या दिवशी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास जेवण करताना घरगुती कारणावरून वाद झाला. या वादात राजूने मुलगा सर्विसवर चाकूने प्राणघातक हल्ला केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी राजूविरुद्ध प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पळून जाण्याच्या बेतात असताना त्याला अटक केली. त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला. त्यानंतर त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. राजू हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध विविध पोलीस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई नांदगाव पेठचे हनमंत डोपेवाड यांच्या मार्गदर्शनात साहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र सहारे, पोलीस उपनिरीक्षक राजेश वाकडे, संजय खारोडे, वैभव सवईकर, नीलेश सावीकर, नावेद खान, गजानन तायडे, सुहास पंचभये, वैभव धुरंदर यांनी केली

## उर्मिला निंबाळकरच्या नावाने टेलिग्रामवर बनावट अकाऊंट





*उर्मिला सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असते आणि आपल्या चाहत्यांबरोबर अपडेट शेअर करत असते. नुकतीच उर्मिलाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर केली आहे, ज्यात उर्मिलाने एक स्क्रीनशॉट शेअर केला आहे. उर्मिलाचं कोणतंही टेलिग्राम अकाउंट नसून तिच्या नावाने एक फेक आयडी बनवण्यात आले होते. यात उर्मिलाच्या फेक अकाउंटवरून एका व्यक्तीला मेसेज केला आहे. यात असं लिहिलं होतं, माझ्या चाहत्याचे खूप अभिनंदन. माझ्या गिवअवेमध्ये तुमची निवड झाली आहे. उर्मिलाने याचा स्क्रीनशॉट टाकून स्टोरीवर शेअर केला. प्रेक्षकांना सत्य परिस्थिती सांगत तिने लिहिले, माझं कोणतंच टेलिग्राम चॅनेल नाही. त्याचप्रमाणे मी कोणतंही गिवअवे करत नाही आहे, अशा ऑफर्सला बळी पडू नका.दरम्यान, 'एक तारा', 'डम डम डिगा डिगा', 'सिंधुताई सकपाळ' अशा अनेक चित्रपटांत उर्मिलाने महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. उर्मिलाच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर ९ फेब्रुवारी २०१३ रोजी उर्मिला बॉयफ्रेंड सुकिर्तबरोबर लग्नबंधनात अडकली. लग्नाच्या आठ वर्षांनंतर ३ ऑगस्ट २०२१ रोजी त्यांना पुत्रलाभ झाला आणि त्यांच्या आयुष्यात अथांग आला.*

## किन्नरसोबत रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या मुलाने दिली आईला धमकी

अमरावती : चार वर्षापासून किन्नरसोबत रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या युवकाने तिच्यासोबतच लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. लग्न करण्याकरिता त्याने आईला पैशाची मागणी केली. परंतु आईने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे त्याने आईला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. ही धक्कादायक घटना बडनेरा ठाण्यांतर्गत उघडकीस आली. बडनेरा ठाण्यांतर्गत राहणारा युवक साफसफाईचे काम करतो. दरम्यान चार वर्षाआधी त्याची एका किन्नरसोबत ओळख झाली. त्यानंतर त्यांच्यात सतत बोलचाल सुरू होती. अशातच त्यांच्यात प्रेम निर्माण झाले. त्यामुळे त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. परंतु समाज व नातेवाईक काय म्हणतील, त्यामुळे त्यांनी आतापर्यंत लग्न केले नाही. परंतु दोघेही मागिल चार वर्षापासून पतीपत्नी सारखे राहत होते. याबाबत युवकाच्या आईला माहिती पडले असता तिने मुलाला खूप समजविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो ऐकण्याच्या मानसिकतेत नव्हता. आता दोघांनी लग्न करून समाजासमोर येण्याचा निर्णय घेतला. परंतु लग्न करण्याकरिता पैसे लागतात. त्यामुळे युवक काही दिवसांआधी आईच्या भेटीला घरी गेला आणि आम्ही दोघे लग्न करणार आहे. त्याकरिता एक लाख रुपयांची मागणी केली. परंतु आईने पैसे देण्यास साफ नकार दिल्यामुळे युवकाने आईला शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. त्यामुळे आईने बडनेरा ठाण्यात धाव घेतली व घडलेला सर्व प्रकार सांगितला. तसेच दोघांचे लग्न झाल्यावर भविष्यात मोठी घटना घडू शकते. त्यामुळे कारवाई करण्याची मागणी केली. तेव्हा बडनेरा पोलिसांनी २१ मार्च रोजी युवकासह किन्नरला ठाण्यात बोलाविले आणि त्यांना विचारपूस केली. त्यानंतर त्यांची समजूत काढून त्यांच्याविरुध्द कलम ११६ (१०७) अन्वये कारवाई करून सोडून दिले.

# केजरीवालांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून दिलासा नाहीच, ईडीकडून २ एप्रिलपर्यंत उत्तर मागितले

नवी दिल्ली : दिल्ली मद्य धोरण घोटाळाप्रकरणी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. केजरीवाल यांनी त्यांच्या अटकेच्या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, परंतु न्यायालयाने त्यांना कोणताही दिलासा दिला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३ एप्रिल रोजी होणार आहे. न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. केजरीवाल यांची ईडी कोठडी २८ मार्च रोजी संपत आहे. अशा परिस्थितीत ईडी गुरुवारी केजरीवाल यांना राऊस एव्हेन्यू कोर्टात हजर करणार आहे. त्याचवेळी केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

आज केजरीवाल यांच्या वतीने युक्तीवाद करताना अ‍ॅड. सिंघवी म्हणाले की, निवडणुकीच्या तोंडावर दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांना झालेली अटक हा निष्पक्ष निवडणुकांना बाधा आणणारी कृती आहे. केजरीवालांना अटक करुन निवडणूक प्रचार सहभागातून त्यांना हटविण्याचा हेतू आहे. त्यामुळेच मी प्रश्न विचारतो, आता अटकेची कारवाई का केली? मुख्यमंत्री केजरीवाल यांना झालेली अटकेसाठी राजकीय हेतूने वेळ निश्चित करण्यात आली. त्यांनी कोणतेही कलम ५० पीएमएलए स्टेटमेंट ( निवेदन ) रेकॉर्ड केलेले नाही. निवेदन हे चौकशीचे स्वरूप आहे. त्यामुळेच अशा प्रकारच्या कारवाईचा .फटका मूळ रचनेला बसत आहे, असा दावाही त्यांनी केला. ही कारवाई म्हणजे लोकशाहीवरील आघात आहे.



केजरीवाल यांची तत्काळ सुटका करावी. कारण अटकेचा आधारच चुकीचा आहे. ही माझी अंतरिम विनंती असल्याचे त्यांनी न्यायालयास सांगितले.

यावर न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा म्हणाले की, मला तुमची आणि त्यांचीही समान सुनावणी करायची आहे. मी इतर बाबतीत उत्तर दाखल करण्याची संधी देत असेल तर मी त्यांनाही ती संधी देईन.

केजरीवाल यांची अटक एका व्यक्तीच्या वक्तव्यावर आधारित आहे ज्याला या प्रकरणात प्रथम अटक करण्यात आली होती आणि नंतर साक्षीदार झाल्यावर त्याला जामीन मिळाला होता. ईडी सक्रिय झाल्यापासून अलिकडच्या काळात असहकार हा सर्वात जास्त गैरवर्तन केलेला शब्द आहे. तुम्ही कबुलीजबाब आणि खुलासा करण्यास नकार देता. सहकार्य करत नाही म्हणून थेट अटक करता येते का, असा सवालही त्यांनी केला.निवडणुकीच्या दोन महिने आधी फेब्रुवारी २०२४ मध्ये तुम्हाला चौकशी करायची असेल तर अटक करण्याची गरज नाही. या प्रकरणी केजरीवालांच्या भूमिकेबद्दलही तुम्हाला माहिती नाही, तुम्हाला शंका आहे. निवडणुकीच्या तोंडावर तुम्ही मला अटक करता. अटकेशिवाय तुम्ही दुसरे काय करणार होता, असे सांगत या वेळी सिंघवी यांनी अटक करण्याच्या आवश्यकतेच्या पैलूंवरील काही निकालांचा संदर्भ दिला. तसेच एखाद्या विभागाला अटक करण्याचा अधिकार आहे. अटक करण्याची इच्छा आहे आणि म्हणून मी अटक करत आहे, दिल्ली मद्य धोरण घोटाळाप्रकरणी राजकीय नेत्यांवर झालेली कारवाई ही चिंतेची बाब आहे. अशी ही कारवाई आहे, असा

## माजी आयपीएस अधिकारी संजीव भट्ट दोषी

नवी दिल्ली : गुजरातमधील गोध्रा हत्याकांड प्रकरणात बनावट कागदपत्रे तयार केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेले माजी आयपीएस अधिकारी संजीव

भट्ट हे आज पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. एका जुन्या २८ वर्षांपूर्वीच्या प्रकरणात त्यांना आज कोर्टाने दोषी जाहीर केले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आलेल्या या निकालामुळे भट्ट हे चर्चेत आले आहेत. पालनपूर इथे

सन १९९६ मध्ये अंमली पदार्थ्यांशी संबंधित एनडीपीएस कायद्यांतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. त्यांना या प्रकरणी बुधवारी, २७ मार्च रोजी पालनपूर सेशन कोर्टात हजर करण्यात आले

# मुलींचे फोटो गाठोड्यात बांधून स्मशानभूमीत करणीचा अघोरी प्रकार

सांगली: स्मशानभूमीत काळ्या कापडात नारळ,लिंबू,काळ्या बाहुल्या त्यावर मुलींचे फोटो व त्यावर धारदार दाभण खुपसून करणीचा अघोरी प्रकार करण्याचा चिकुर्डे (ता.वाळवा) येथे बुधवारी उघडकीस आला. होळी पौर्णिमेपासून रस्त्याच्या लगत असणाऱ्या स्मशानभूमीत हा प्रकार सुरू होता. आज बुधवारी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीत धाव घेत हा प्रकार उघडकीस आणला.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव संजय बनसोडे, कार्यकर्ते निवृत्त उपप्राचार्य बी. आर. जाधव, निवृत्त प्राचार्य डॉ. सुदाम माने,विनोद मोहिते यांनी हा नेमका काय प्रकार आहे हे उघडकीस आणल्यावर उपस्थित नागरिकांचे प्रबोधन करून स्मशानभूमीची स्वच्छता केली.



कुरळप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सरनोबत म्हणाले, या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन मुळापर्यत तपास करू. कोणत्याही मुलींची ओळख जाहीर न करता गोपनीय तपास करून दोषींवर गुन्हे दाखल करू.अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी पोलीस पाटलांच्या समक्ष काळ्या कापडातील लटकत्या बाहुल्या व इतर साहित्य काढले.आत पाहिल्यावर धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कापड सोडल्यावर त्यातून नारळ, त्यावर काळी बाहुली,लिंबु व मुलींचे रंगीत फोटोला टोकदार दाभनातून नारळात खुपसले होते. तर नारळाला लाल रंगाचा दोरा गुंडाळून त्यात कागदी चिठ्या खुपसल्या होत्या. त्या उघडून पाहिल्यावर कागदावर मुलीचे नाव लिहले आहे. अशी पाच गाठोडी आहेत. यात पाच वेगवेगळ्या मुलींचे फोटो व नावे आहेत. एका कागदावर एका मुलाचे नाव आहे. हे सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या प्रकरणी दोषींचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी अंनिसचे प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी केली आहे.

# भारतीय संविधान देशाचा परिवर्तनकारी दस्तावेज : न्या.बी.आर. गवई

नागपूर :भारतीय संविधान हा देशातील सर्व नागरिकांसाठी न्याय, समानता आणि सन्मान राखणारा परिवर्तनकारी दस्तावेज आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी कोलंबिया लॉ स्कूलमधील व्याख्यानात केले.

संयुक्त राष्ट्र अमेरिकेच्या भेटीमध्ये मंगळवारी २६ मार्च रोजी न्यूयॉर्क येथील कोलंबिया लॉ स्कूल येथे आयोजित कार्यक्रमात मा. न्यायमूर्ती बी.आर.गवई यांनी ‘परिवर्तनात्मक संविधानवादाची ७५ वर्षे’ या विषयावर व्याख्यान दिले.

या व्याख्यानामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी भारतीय संविधानाच्या तीन महत्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला. संविधानाचे परिवर्तनशील उद्दिष्ट, महत्वाच्या कायद्यांद्वारे त्यातील टिकून ठेवलेले सातत्य आणि सर्वोच्च न्यायालयाने विविध क्षेत्रात आपल्या निर्णयाद्वारे टिकवून ठेवलेले परिवर्तनवादी घटनावादाचे मूल्य या पैलूंचे न्या. गवई यांनी विवेचन केले.

ते म्हणाले, भारतीय संविधान हे वसाहतवादातून लोकशाहीत आणि ‘राणीचे आदेश’ पासून ते ‘जनतेची इच्छा’ या पर्यंत भारतातील शासन रचनेच्या परिवर्तनाचा पुरावा आहे. बदलत्या सामाजिक निकषांमध्ये कायदा सुसंगत राहील याची खात्री करणे हे न्यायालयांचे कर्तव्य आहे.





तर सर्वोच्च न्यायालयाची भूमिका ही परिवर्तनवादी लोकाचाराच्या केंद्रस्थानी असून सर्वोच्च न्यायालय संविधानाचा संरक्षक आणि न्यायाचा अंतिम लवाद म्हणून काम करीत असल्याचे देखील त्यांनी सांगितले. लोकशाही आणि न्यायिक पुनरावलोकनाची तत्त्वे एकमेकांशी जोडलेली आणि पूरक आहेत, असेही ते म्हणाले.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांच्या प्रकरणाची व्याप्ती कशी विस्तृत केली हे त्यांनी अनेक उदाहरणांतून स्पष्ट केले. कायदेमंडळाने घटनात्मक आदर्शांचे समर्थन करण्यासाठी आणि समाजातील असुरक्षित आणि उपेक्षित घटकांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी केलेल्या अग्रगण्य कायद्यांचा देखील त्यांनी उहापोह केला.अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, छ-ङड- विरुद्ध भारत संघ यांच्यातील निकालानंतर निर्माण झालेला तृतीयपंथींच्या हक्कांचे संरक्षण कायदा, बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम, बालविवाह प्रतिबंध कायदा, बालकांच्या मोफत आणि शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा, अपंग व्यक्तींचे हक्क, अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वन हक्कांची मान्यता) कायदा अशा अनेक कायद्यांची न्या. गवई यांनी यावेळी माहिती दिली.

परिवर्तनवादी घटनावादाला चालना देण्यासाठी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर चर्चा करताना त्यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांचे दाखले दिले. नैसर्गिक न्यायाच्या संदर्भातील मनेका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया प्रकरण, केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य प्रकरणाचा उल्लेख करताना त्यांनी या प्रकरणातील निकालाने ‘मूलभूत हक्क’ आणि ‘राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे’ यांच्यातील पूर्वीच्या संघर्षाचे निराकरण झाल्याचे मत मांडले. याशिवाय त्यांनी एलजीबीटीआयक्यू समुदायाच्या संदर्भातील नवतेज सिंग जोहर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया प्रकरण, सी.बी. मुथम्मा आयएफएस विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि एअर इंडिया विरुद्ध नर्गेश मीर्झा प्रकरण, हरिराम भांभी विरुद्ध सत्यनारायण प्रकरण, मद्रास स्टेट विरुद्ध श्रीमथी चंपकम दोराईराजन प्रकरण, इंद्रा साहनी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि बी.के. पवित्रा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया प्रकरण, उन्नीकृष्णन, जेपी विरुद्ध आंध्रप्रदेश राज्य अशा अनेक प्रकरणांतून न्यायव्यस्थेची संविधानाचे संरक्षण आणि परिवर्तन यामधील भूमिका न्या. बी.आर. गवई यांनी विषद केली.भारतातील पर्यावरण संरक्षणात लक्षणीय प्रगती करण्यात जनहित याचिका महत्वपूर्ण ठरल्याचे देखील प्रतिपादन न्या.बी.आर. गवई यांनी केले. त्यांनी एम.सी.मेहता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया प्रकरणाचा संदर्भ देत या निकालात सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील प्रदूषण निर्माण करणारे उद्योग बंद करण्याचे निर्देश दिले आणि पुढे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले. याशिवाय हुसैनारा खातून विरुद्ध बिहार राज्य, बंधुआ मुक्ती मोर्चा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि विशाका विरुद्ध राजस्थान राज्य अशा प्रकरणांचे देखील उदाहरण दिले.व्याख्यानाच्या सुरूवातीला न्या. बी.आर.गवई यांनी डॉ. आंबेडकरांनी संविधानाला रक्तहीन क्रांतीचे शस्त्र मानले. त्या बाबासाहेबांनी ज्या कोलंबिया विद्यापीठातून एम.ए. पीएचडी केली तिथे व्याख्यान देण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांच्यामुळेच या पदापर्यंत पोहोचलो’ या सर्वोच्च न्यायालयाच्या हिरक महोत्सवातील त्यांच्या उद्गाराचा त्यांनी पुनरुच्चार करून ऋणनिर्देश व्यक्त केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

अमरावती : अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना १७ मार्च रोजी लोणी ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा गावाजवळ घडली. या प्रकरणी २६ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

हरिओम यादव रा. अमरावती असे मृतकाचे नाव आहे. हरिओम यादव हे दुचाकीने नातेवाइकाला भेटायला जात होते. मार्गात अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या हरिओम यादव यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

परंतु, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृतक हरिओम यादव यांची मुलगी पूजा (२६) यांनी लोणी ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.







गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती–६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)